


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार ३ डिसेंबर २०२४ | अंक ३५९ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# हार असो की जीत, दादागिरीसाठी ओळखले जाणारे टार्गेट अजितदादा

लोकसभेच्या पराभवाचं खापर भाजपच्या अनेक लोकांनी अजित पवारांवर फोडलं. त्यानंतर आता विधानसभेत मिळालेल्या कमी जागांवरुन शिंदेंच्या नेत्यांकडून अजित पवारांना खलनायक ठरवलं जातंय. एरव्ही बार्गेनिंगमध्ये दादागिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या अजितदादांनी ना मुख्यमंत्रीपदावर दावा सांगितलाय, ना ही त्यांनी गृहखात्यासाठी आग्रह धरलाय. लोकसभेत वाट्याला फक्त ४ जागा येवूनही दादांचा गट रुसला नाही आणि विधानसभेत फक्त ५९ जागा मिळूनही नाराजीचा एक शब्दही काढला नाही. पण तरी महायुतीत पराभवाचे खलनायक आणि मोठ्या विजयातले अडसरही अजित पवारच असल्याची विधानं होतायत.गुलाबराव पाटलांचा तर्क असा आहे की जर अजित पवार महायुतीत नसते तर शिंदेंच्या शिवसेनेला २८८ पैकी १२५ जागा आरामात लढायला मिळाल्या असत्या. त्यापैकी आम्ही १०० जागा जिंकून उर्वरित १६३ जागा भाजप आणि मित्रपक्ष लढले असते. भुजबळांचं म्हणणं आहे की जर शिंदेंच महायुतीत नसते., तर सव्वाशे जागा लढून आम्हालाही १०० जागा मिळाल्या असत्या आणि उर्वरित १६३ जागी भाजप लढली असती.



महायुतीत शिंदेंच्या ८१ पैकी ५७ जागा आल्या. स्ट्राईक रेट जवळपास ७० चा राहिला. ५९ पैकी ४१ जागा जिंकणाऱ्या अजित पवारांचा स्ट्राईक रेट जवळपास ६९ होता. आणि १४९ लढून १३२ जागा मिळवणाऱ्या भाजपचा स्ट्राईक रेट जवळपास ८० राहिला. या स्ट्राईक रेटनुसार जर भाजप स्वबळावर १७० जागा लढली असती तर १४५ च्या बहुमताचा आकडा त्यांनी एकट्यानं पार केला असता., पण अद्याप शिंदे-दादांच्या नेत्यांच्या वादात भाजपनं उडी घेतलेली नाही. लोकसभेला १५ पैकी ७ खासदार जिंकणाऱ्या शिंदेंच्या शिवसेनेचा स्ट्राईक रेट जवळपास ४६ होता. ४ पैकी १ जिंकणाऱ्या अजित पवारांचा स्ट्राईक रेट २५ चा आणि २८ पैकी ९ खासदार जिंकणाऱ्या भाजपचा स्ट्राईक रेट ३२ राहिला. तेव्हा लोकसभा निकालानंतर भाजपचा आकडा घटला म्हणून भाजपच्याच काही नेत्यांनी दादांवर खापर फोडलं होतं. आणि आता विधानसभेला अजून आकडा वाढला असता म्हणून शिंदेंच्या नेत्यांनी अजित पवारांना टार्गेट केलंय. लोकसभेपासून महायुतीत अजित पवार सॉफ्ट टार्गेट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. कारण, अजित पवारांनी ४१ जागा जिंकल्या असल्या तरी त्यांचे काही उमेदवार भाजपातून आयात केले होते. प्रचारादरम्यान सर्वच पक्षात बड्या नेत्यांचे प्रवेश होत असताना अजित पवार गटात कोणत्याही मोठ्या नेत्यानं प्रवेश केला नाही. म्हणून हार होवो की जीत लोकसभेनंतर आता शिंदेंच्या सेनेकडून अजितदादा कारणीभूत ठरवले जातायत.

## गृहमंत्रीपदावरून कोणताही पेच नाही - छगन भुजबळ



महायुतीला विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळालं असून येत्या ५ डिसेंबरला आझाद मैदानावर थपथविधी होणार आहे. अवघे २ दिवस उरलेत तरी राज्याच्या मुख्यमंत्री कोण, गृहखातं कोणाकडे राहणार, इतर खाती कोणत्या मंत्र्यांना मिळणार याची माहिती अद्याप जाहीर झालेली नाहीत. मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडणारे एकनाथ शिंदे गृहमंत्री आग्रही असल्याचे वृत्त त्यामुळे सरकारच पेचात सापडल्याची चर्चा आहे. मात्र महायुतीतील नेत्यांनी या चर्चा फेटाळून लावल्या आहेत. महायुतीमधील प्रमुख पक्षांपैकी एक असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी यावरून एक वक्तव्य केलं आहे. गृहमंत्री पदावरून कोणताही पेच नाही, त्याच्यावरून काही अडले नाही असे ते म्हणाले.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे भुवनेश्वरला होते, त्यामुळे काहीच निर्णय होण्यासारखा नव्हता. त्यामुळे ते पुढे गेलेलं आहे. प्रत्येक पार्टीची अंतर्गत चर्चा झालेली असते,त्यामुळे हा निर्णयही होईल, असं भुजबळ यांनी स्पष्ट केलं



**सातपुडा शासकीय निवासस्थानी महाराष्ट्रातील सर्वाधिक मताधिक्याने परळी विधानसभेतून निवडून आलेले ना. धनंजय मुंडे यांना शुभेच्छा दिल्या. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका बीड मतदार संघातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, व नगरपालिका, यावर चर्चा झाली. तसेच वाल्मीक अण्णा कराड यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड तालुक्याच्या वतीने स्वागत केले. यावेळेस बीड राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष महादेव उबाळे, शहराध्यक्ष बाळासाहेब गुजर, युवक तालुकाध्यक्ष नंदकुमार कुटे, पंचायत समिती सदस्य सचिन शेळके, केशव तांदळे, उपस्थित होते.**

## जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभातफेरीस उत्स्फूर्त प्रतिसाद



बीड, दिनांक २ : जागतिक एड्स दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनपर्यंत एड्स प्रतिबंधात्मक जनजागृती प्रभात फेरी आज काढण्यात आली. रॅलीस युवा वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. प्रभातफेरीचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव जी.जी. सोनी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. प्रभातफेरीमध्ये महाविद्यालयीन युवक-युवती, रेड रिबन क्लब सदस्य, रोटरी क्लब अध्यक्ष, इन्नर व्हील क्लब, इन्फंट इंडिया, विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, विविध अशासकीय संस्थेचे कर्मचारी तसेच सामाजिक कार्यकर्ते, सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांना एड्स मुक्त जीवन जगण्याची शपथ यावेळी देण्यात आली. अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ.अशोक थोरात यांनी एचआयव्ही, एड्स जनजागृती रॅलीमधून दिलेली माहिती सर्व समाजातील घटकांपर्यंत पोहचवावी, असे आवाहन केले. त्यानंतर उपस्थित शाळा, महाविद्यालयांना तसेच अशासकीय संस्थांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरुण राऊत, तत्वशील कांबळे, रोटरी क्लबचे अध्यक्ष नितीन गोपन यांनी युवक-युवतींना मार्गदर्शन केले. अशोक तांगडे यांनी गिताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी यांनी केले. श्रीमती राजश्री हिवरेकर यांनी सूत्रसंचालन केले. एफ.आर.फारोकी यांनी आभार मानले.

## आ.विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते होणार जिल्हा कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेचे उद्घाटन

**पाटोदा । प्रतिनिधी** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी बीड जिल्हा कबड्डी असोसिएशन व जय हनुमान क्रीडा मंडळ महासांगवी यांच्या संयुक्त विद्यामाने जिल्हा कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेचे आयोजन केलेले आहे .मंगळवार दिनांक ३ डिसेंबर २०२४ रोजी मौजे महासांगवी ता.पाटोदा येथे बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या व जय हनुमान क्रीडा मंडळ च्या वतीने किशोर किशोरी कुमार कुमारी व पुरुष महिला गटाच्या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे .सदरील स्पर्धेचे उद्घाटन गेवराई विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार तथा बीड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा.श्री



विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते दिनांक ३ डिसेंबर रोजी सकाळी ठीक १०:३० वाजता होणार आहे. तरी सर्व क्रिडा मंडळांनी व खेळाडूनी सकाळी ठिक ९:३०वाजता किट मध्ये उपस्थित राहावे. सदरील कबड्डी चाचणी व अजिंक्य स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यास पाटोदा तालुक्यातील व पंचक्रोशीतील क्रिडा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आहवान जिल्हा कबड्डी असोसिएशन व जय हनुमान क्रिडा मंडळ यांच्या वतीने करण्यात आले

## बैलगाडी उलटून शाळकरी विद्यार्थ्यांचा मृत्यू ; डोलारा येथील दुर्घटना

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने बैलगाडीतून शेताकडे जात असताना बैलगाडी उलटून झालेल्या अपघातात एका चिमुकल्या बालकाचा मृत्यू झाला तर दोन बालके जखमी झाले. ही दुर्घटना लोहा तालुक्यातील डोलारा शिवारात दि.१ डिसेंबर रोजी घडली. डोलारा येथील अल्पभूधारक शेतकरी संतोष माणिका शिंदे त्यांचा मुलगा रुद्र संतोष शिंदे वय ७ व मुलगी पायल शिंदे वय १२, श्रेया वळीराम बेटकर वय १२ यांच्यासह रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने पांडुरंग बळीराम



बेटकर यांच्या बैलगाडीतून शेताकडे जाण्यासाठी निघाले. मात्र रस्त्यात उताराच्या ठिकाणी ही बैलगाडी अचानक उलटली व गाडीचा लोखंडी पाळणा मुलांच्या अंगावर पडला. या अपघातात चिमुकला रुद्र संतोष शिंदे वय ७ हा मुलगा गंभीर जखमी झाला. शेजारील शेतक-यानी धावाधाव करत गंभीर जखमी रुद्रला नांदेड येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारा पूर्वीच या मुलाचा मृत्यू झाला.रुद्र हा इंग्लिश मीडियममध्ये पहिलीत शिक्षण घेत होता. शाळेत सर्वात हशार व आई वडिलांस एकुलता एक मुलगा होता. या अपघातात मयत रुद्रची बहिण पायल शिंदे, श्रेया पांडुरंग बेटकर हिच्यासह अन्य पाच शाळकरी मित्र या बैलगाडीतून जात होती. मात्र यांना सुदैवाने यातील दोघींना किरकोळ दुखापत झाली.रात्री उशीरा शोकाकुल वातावरणात रुद्रच्या पार्थिवावर डोलारा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई-वडील, दोन बहिणी असा परिवार आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## अभिजीत पवार यांना राज्यस्तरीय युवा आदर्श पत्रकार पुरस्कार जाहिर

बीड प्रतिनिधी - बीड जिल्ह्यातील दैनिक बीड चे संपादक अभिजीत पवार यांना राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव युवा आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा ०५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ वा. तालुका शिक्षक संघ पतसंस्था हॉल , ४० बिघा मलकापूर जि. बुलढाणा येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जि. बुलढाणा संस्थापक अध्यक्ष विवेक सुभाष राजापुरे यांनी दिली आहे. क्षेत्रातील मान्यवरांना राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. तसेच आदर्श पत्रकार पुरस्कार म्हणून बीड जिल्ह्यातील अभिजीत पवार यांना राष्ट्रभक्ती सेवा गौरव आदर्श युवा पत्रकार पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आलेला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असून, शेतक-यांसाठी अनेक वेळा मीडियाच्या माध्यमातून आवाज उठवलेले अभिजीत पवार आहेत. बीड चे युवा पत्रकार अभिजीत पवार यांनी आपल्या प्रिंट मीडिया न्यूज पोर्टलच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, आर्थिक, तसेच सर्व स्तरातील बातम्या जनतेपर्यंत पोहोचवण्याचे प्रामाणिक कार्य केले आहे. काही वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करणारे अभिजीत पवार हे सामाजिक राजकीय याचे भान असलेले पत्रकार असून यांनी आत्तापर्यंत आपल्या लेखणी द्वारे समाजातील विविध घटकातील समस्यावर लिखाण करून न्याय



देण्याचा प्रयत्न केला करत आहेत अशा तरुण पत्रकार्याच्या कार्याची दखल घेऊन या माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जि. बुलढाणा यांनी राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कारासाठी निवड केली आहे. अभिजीत पवार यांनी बीड जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर आपल्या लेखणी द्वारे वस्तुनिष्ठ लिखाण करून सामाजिक कार्यास न्याय देण्याचा प्रयत्न केला अशा या तरुण पत्रकाराचा गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने होत आहे. हे अभिमानाची गोष्ट आहे. आत्तापर्यंत पत्रकारिता क्षेत्रात विविध प्रकारचे लेखन करून व सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घेऊन केलेल्या कार्याची दखल वरील संस्थेने घेऊन त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिजीत पवार यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्राप्त झाल्याबद्दल बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बंधू आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून कडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## महाराणी ताराबाई विद्यालयाचे क्रीडाशिक्षक उत्तरेश्वर धस यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

वडवणी। प्रतिनिधी वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे क्रीडाशिक्षक उत्तरेश्वररावजी धस सर यांनी ३२ वर्ष ०४ महिने २८ दिवस प्रदीर्घकाळ विद्यालयांमध्ये ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून वयोमानानुसार शनिवार दि.३०नोव्हेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सेवापूर्ती गौरव सोहळ्याचा कार्यक्रम विद्यालयामध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच सौ.सुलोचनाताई आंधळे तर प्रमुख अतिथी म्हणून उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,उपसभापती अनिलदादा चोले,संचालक पांडुरंग अंडील,सेवानिवृत्त मुख्याध्यापक मधुकररावजी धस,कोषाध्यक्षा सौ.जिजाबाई धस,सेवानिवृत्त मुख्याध्यापक डोईफोडे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक उद्धवरावजी सांगळे,नगरसेवक सतीष बप्पा बडे,युवा नेते अमोलराजे आंधळे,संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे, विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर अदिजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. चंदना कापले,वैष्णवी यादव, आकांक्षा गावडे या विद्यार्थिनींनी स्वागतगीत गाऊन सर्व मान्यवर व उपस्थितांचे स्वागत केले.विद्यालयातील विद्यार्थिनी कु.राधिका निरडे,कु.शिंदे अंकिता,कु.झाडे निकिता यांनी धस सर यांच्या बद्दल आपल्या शाळेतील आठवणी सांगितल्या तसेच श्रीमती संजिवनीताई आंधळे व ठोंबरे सर,माजी नगरसेवक सतीषबप्पा बडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून धस सरांना सेवापूर्ती निमित्त शुभेच्छा दिल्या.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उद्गारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी – अहिराणी – खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर – माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण – उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा (मियते) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

# आली समीप घटिका!

सुमारे आठवडाभर मुख्यमंत्रिपदावरून घोळ घातल्यानंतर आता राज्यात स्पष्ट बहुमत मिळालेल्या महायुती सरकारला नवीन सरकार स्थापनेच्या शपथविधीसाठी अखेर मुहूर्त मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत राज्यातील महायुती सरकारचा शपथविधी येत्या गुरुवारी, ५ डिसेंबरला मुंबईतील आझाद मैदानावर सायंकाळी ५ वाजता होणार आहे. शपथविधीसाठी एनडीएमधील प्रमुख नेत्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. महाराष्ट्रात महायुती सरकारला स्पष्ट बहुमत मिळाले असले तरी निकालानंतर सात दिवसांनंतरही सरकार स्थापण्यात आलेले नाही. मंगळवारी (३ डिसेंबर) भाजपच्या गटनेता निवडीसाठी आमदारांची बैठक होणार आहे. भाजपचे निरीक्षक राज्यात येऊन गटनेत्याची निवड करणार आहेत. ५ डिसेंबरला नव्या सरकारमधील मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल. या सोहळ्याला पंतप्रधान मोदींसह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून एक आठवडा उलटल्यानंतरही महायुतीने सरकार स्थापनेचा दावा न केल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. महायुतीने राजभवनात जाऊन राजशिष्टाचाराप्रमाणे राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा करणे गरजेचे होते. पण भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुती सरकारच्या शपथविधीची तारीखच जाहीर करून टाकली. शिवसेना, राष्ट्रवादीला अंधारात ठेवून हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे महायुतीतही सारेकाही आलबेल नसल्याचे दिसून येत आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी महायुती सरकारच्या शपथविधीची घोषणा परस्पर ङ्गएक्सफ्वरून करून टाकली. भाजपने अजून विधिमंडळ नेतेपदाची निवड केली नाही. नवीन नेत्याने राज्यपालांकडे जाऊन सरकार स्थापनेचा दावा केलेला नाही. तसेच राज्यपालांनी आपल्या घटनात्मक अधिकाराचा वापर करून शपथविधीसाठी नेत्याला औपचारिकपणे निमंत्रित केले नाही. तरीही ठिकाण आणि वेळ कोणी ठरवली असे अनेक प्रश्न बावनकुळे यांच्या घोषणेनंतर उपस्थित झाले आहेत. गुरुवारी रात्री दिल्लीत झालेल्या बैठकीनंतरही सरकार स्थापनेबाबत कोणतीही हालचाल झालेली नाही. काळजीवाहू मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या डावपेचांबाबत सावधगिरी बाळगली आहे. ते नाराज असल्याचे बोलले जाते. म्हणूनच ते आपल्या गावी निघून गेल्याचे सांगितले जाते. मोठा निर्णय घेण्याआधी एकनाथ शिंदे आपल्या गावी जातात असे वक्तव्य शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केल्याने ङ्गसस्पेन्सफ आणखी वाढला आहे. सध्या निर्माण झालेल्या तिढ्यावर मात करण्यासाठी भाजपने पुढे जाण्याचे धोरण ठेवले आहे. गुरुवारी कोण शपथ घेणार ते अजून निश्चित झालेले नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा मंत्री शपथ घेणार का याबाबत मौन बाळगण्यात आले आहे. भाजपचे राज्यातील ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस हे सरकार स्थापनेबाबत चकार शब्द काढत नाहीत. शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट, शंभुराज देसाई, भरत गोगावले यांनी मात्र एकनाथ शिंदे यांच्यासाठी गृहखात्याची मागणी केली आहे. विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी २३० जागा जिंकणा-या महायुतीचे घोडे मुख्यमंत्रिपदावरून अडले आहे. संघपरिवार व भाजपमध्ये मुख्यमंत्रिपदाच्या नावावरून जोरदार संघर्ष सुरू असल्याचे बोलले जात आहे. फडणवीस यांच्यासाठी संघ परिवार हट्टाला पेटला आहे तर भाजपचे वरिष्ठ नेतृत्व ब्राह्मणेतर व्यक्तीसाठी (मराठा समाज) आग्रही असल्याची चर्चा आहे. त्यामुळे निकाल लागून आठवडा उलटला तरी मुख्यमंत्रिपदाचा तिढा सुटलेला नाही. अनेक मुद्यांवर भाजपचे नेतृत्व आणि रा. स्व. संघ यांच्यात मतभेद आहेत. भाजपला आता संघाची गरज नाही असे जाहीर वक्तव्य भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केले होते. आता राज्याच्या मुख्यमंत्री निवडीत होणारा विलंबही संघ-भाजपमधील मतभेदामुळे लांबल्याचे दिसून येत आहे. भाजपला १३२ जागा मिळाल्यानंतरही एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदासाठी दावा केला. ही निवडणूक माझ्या नेतृत्वाखाली लढवली गेली. राज्यात लोकप्रिय ठरलेल्या लाडकी बहीण योजनेचा मी शिल्पकार असल्याने हे यश मिळाल्याचा दावा त्यांनी केला आहे. पण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपचाच मुख्यमंत्री होणार असल्याचे सांगितले. त्यानंतर भाजपचे केंद्रीय नेतृत्व जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल असे शिंदे यांनी ठाणे येथील आपल्या निवासस्थानी घेतलेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केले. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री बनण्याला भाजपमधील दोन वरिष्ठ नेत्यांचा आक्षेप आहे. यावर संघाचा सवाल असा की, फडणवीस हे ब्राह्मण आहेत, २०१४ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री बनल्यानंतर त्यांनी पाच वर्षांची आपली कारकीर्द पूर्ण केली होती. तेव्हा ते ब्राह्मण होते हे भाजपच्या नेतृत्वाला माहीत नव्हते का? भाजपचे नेतृत्व ङ्गओव्हरस्मार्टफ आहे. फडणवीस यांची निवड न करता आपण मुलखावेगळी कामगिरी करत आहोत असा भाजप नेतृत्वाचा समज आहे. वास्तविक पाहता त्यांच्या विचारांना कोणताही तर्क नाही. फडणवीस यांची क्षमता भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे असे रा. स्व. संघाचे मत आहे. राज्यात मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून अद्याप तिन्ही पक्षांमध्ये सहमती झालेली नाही. महायुती सरकारच्या रचनेबाबत अमित शहा यांच्या दिल्लीतील निवासस्थानी गुरुवारी रात्री सुमारे तीन तास बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस हेच असतील हे स्पष्ट करण्यात आले. मात्र पुण्यातील खासदार मुरलीधर मोहोळ, आमदार चंद्रकांत पाटील हे सुद्धा मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असू शकतात अशीही चर्चा आहे. त्यामुळे भाजप धक्कातंत्राचा वापर करणार का याकडे सा-यांचे लक्ष आहे. मुख्यमंत्रिपद तसेच खातेवाटपाचा फॉर्म्युला निश्चित न झाल्याने ङ्गबार्गेनिंग पॉवरफ वाढविण्यासाठी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी निघून गेले आहेत. तेथे ते आजारी पडले आहेत म्हणे. तेव्हा आता राज्याची काळजी राहिली बाजूला. मुख्यमंत्री शिंदे यांचीच काळजी घेण्याची वेळ आली आहे. असो. शपथविधी घटिका जवळ आली आहे. त्यासाठी तयार रहा!

## भुक

संपता संपणा ! देवा हीरे भुक !!
जीवासया धाक ! तिचासदा !!

भुकेपोठी देवा ! व्याकुळतो प्राण !
अन्नाचाहा कण ! मिळवया !!

जगणं झालं देवा ! उधारहे सारं !
उदासीन वारं ! सुटलंर !!

पोटासाठी देवा ! हिंडे वन वन !
अंतकाठी प्राण ! ठेऊनीया !!

कातड्याला आंग ! पडली भुकूने !
गरीबीचे जिणे ! जगतांना !!

नका आता करू ! अन्नाचे वाटोळे !
सर्वांशीच मिळे ! पोटभर!!

करणीही देवा ! तुझीचही सारी !
नको वा-यावरी! ठेवूकोना !!

**अंगद दराडे**
**घळाटवाडी , बीड**
**८६६८६८२६२०**

# गाजर लागवड आणि व्यवस्थापन

गाजर म्हणले की आपल्या डोळ्यासमोर येतो तो सुंदर लाल रंगाचा आणि चवदार गाजराचा हलवा.गाजरा मध्ये व्हिटॅमिन मुबलक प्रमाणात आढळते. गाजराचे कच्चा सॅलडच्या स्वरूपात खूप फायदे आहेत. हवामान :गाजर पिकासाठी ८ ते २८ अंश सेल्सिअस तापमान योग्य असते. तर जास्त उष्ण असलेल्या भागात त्याची वाढ होत नाही. म्हणजे का जर हे थंड हवामानातील पीक आहे. जमीन निवड :गाजराच्या पिकासाठी पाण्याचा निचरा होणारी चिकन माती सर्वोत्तम ठरते. त्यात गाजराचे पिक चांगल्या प्रकारे येते. तर पाणी साचलेल्या जमिनीत मुळे कुजण्याची व पीक निकामी होण्याचा धोका राहतो. लागवड पध्दती : गाजराच्या लागवडीसाठी जमिन खोल उभी आडवी नांगरुन घ्यावी. जमिन सपाट करुन घ्यावी. बी सरीवरंब्यावर पेरावी. दोन वरंब्यातील अंतर ४५ सेमी ठेवावी बियाची टोकून पेरणी करतांना ३० ते ४५ सेमी अंतरावर सरी ओढून दोन्ही बाजूंनी १५ सेमी अंतरावर टोकन पध्दतीने लागवड करावी. पाभरीने बी पेरतांना दोन ओळीत ३० ते ४५ सेमी अंतर ठेवावी आणि नंतर विरळणी करून दोन रोपातील अंतर ८ सेमी ठेवावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी गाजराचे सुमारे ४ ते ६ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाणे उगवून येण्यास पेरणीनंतर १२ ते १५ दिवस लागतात. पेरणीपूर्वी बियाणे २४



तास पाण्यात भिजत ठेवल्यास हा काळ कमी करता येतो. जमीन मशागत व शेण खत टाकणे : गाजर पिकासाठी निवडलेल्या शेतात शेणखत टाकणे अत्यंत महत्त्वाचे असते.कारण त्यामुळे शेतातील उत्पादनही वाढते. शेणखत टाकण्याआधी जमीन २ ते ३ वेळा नांगरणी करून व्यवस्थित भुसभुशीत करून घ्यावी.शेवटच्या नांगरणीच्या वेळी हेक्टरी ३५ टन शेणखत वापरल्यास गाजरांचे चांगले उत्पादन होण्यास मदत होते. गाजराच्या सुधारित जाती : १.पुसा केसर २.पुसा मेघालय ३.गाजर २९ ४.हिसार रसाळ सिंचन व्यवस्थापन : गाजराच्या पिकासाठी ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देणे फायदेशीर ठरते. तर यासाठी पाण्याचा निचरा होणारी व्यवस्था शेतात असली पाहिजे. खत व्यवस्थापन : गाजर पिकासाठी मुख्यत ३ खतांची आवश्यकता असते. १. पोटॅश २.डॅप ३.नायट्रोजन गाजर लागवडीच्या वेळी या खतांचा वापर ३० किलो नत्र व ३० किलो पालाश प्रति हेक्टरी खत म्हणून वापरावा. खर्च व उत्पादन : एक हेक्टर क्षेत्रामधून गाजराच्या काही जाती पासून १५० क्विंटल पर्यंत उत्पादन निघू शकते. गाजर पिकास तयार होण्यास ७० ते ७५ दिवसांचा कालावधी लागतो. तर १ किलो गाजर पिकवण्यासाठी ६ ते ८ रुपये खर्च येतो.तर एखाद्या व्यक्तीने १ किलो गाजर पिकवले तर त्याची किंमत ७ ते ८ रुपये असते. कीड रोग आणि त्यांचे नियंत्रण : गाजराच्या पिकावर साडया भुंगा (कॅरट विव्हिल) सहा ठिपके असलेले तुडतुडे आणि रूटफलाय या किडीचा उपद्रव होतो. सोंडया भुंगा आणि तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १० मिली मेलॅथिऑन मिसळून फवारावे. गाजरावर रूटफलाय या किडीची प्रौढ माशी गर्द हिरव्या ते काळसर रंगाची असते. या किडिच्या अळया पिवळसर पांढऱ्या रंगाच्या असून त्या गाजराची मुळे पोखरुन आत शिरतात आणि आतील भाग खात त्यामुळे गाजराची मुळे वेडीवाकडी होतात आणि कुजतात. गाजराची पाने सुकतात. या किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ३ मिली डायमेथॉएट मिसळून फवारावे. गाजराच्या पिकावर करपा, भुरी, मर पानांवरील ठिपके इत्यादी रोगांची लागण होत

# हेल्मेट सक्ती करा, पण आधी रस्ते नीट करा

राज्य पोलिसांनी हेल्मेटबाबत पुन्हा एकवार कडक भूमिका घेण्याचा निर्धार केलेला दिसत आहे. दुचाकी वाहनावर बसणाऱ्या चालकाला व त्यापाठीमागे बसणाऱ्या प्रवाशाला हेल्मेट सक्तीचे निर्देश दिले आहेत. हेल्मेट सक्ती ही दुचाकीस्वाराच्या जीवितासाठी अत्यावश्यक बाब असली तरी या निर्देशाची अंमलबजावणी करण्याआधी पोलिसांनी सर्वच बाबींचा सखोल विचार करणे आवश्यक होते. मुळातच मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक अशा सर्वच शहरामध्ये आता घरटी दुचाकीचे प्रमाण वाढू लागले आहे. काही घरांमध्ये दोन ते तीन दुचाकीही पाहावयास मिळू लागल्या आहेत. घरामध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलाही दुचाकी चालवू लागल्याने दुचाकीच्या मार्केटमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने भौतिक सुखाच्या संकल्पना बळावल्या आहेत. सार्वजनिक प्रवासी सुविधा पुरवणाऱ्या वाहनांकडे कानाडोळा करत स्वमालकीच्या दुचाकी तसेच चारचाकी वाहनातून प्रवास करण्याकडे आता अनेकांचा कल वाढू लागला आहे. चारचाकी वाहनेदेखील सेंकडहॅण्डमध्ये दीड-दोन लाखांमध्ये उपलब्ध होऊ लागल्याने घरोघरी दुचाकी पाठोपाठ चारचाकी वाहने मोठ्या संख्येने दिमाखात उभी राहू लागली आहेत. दुचाकी व चारचाकी वाहनांच्या विक्रीचा आलेख गगनभरारी घेत असला तरी रस्त्यांची संख्या वाढली का? रस्त्यावरील खड्ड्यांची संख्या कमी झाली का? पदपथावरून फेरीवाल्यांचे पूर्णपणे उच्चाटन होऊन पादचाऱ्यांना ये-जा करण्यासाठी पदपथ मोकळे झाले का? वाहनांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत या वाहतूक व्यवस्थेला नियंत्रित करण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या संख्येत वाढ झाली का? या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुळात हेल्मेट सक्ती याचा या बाबींशी प्रत्यक्षात जरी संबंध येत नसला तरी या बाबी कळत-नकळत एकमेकांशी जोडल्या गेल्या आहेत, हे नाकारूनदेखील चालणार नाही. हेल्मेट सक्तीचा निर्णय घेण्यापूर्वी वाहनांच्या तुलनेत सरासरी दोन प्रवाशांचा विचार केल्यास बाजारामध्ये तितक्या संख्येने हेल्मेट विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याचाही आढावा घेणे आवश्यक होते. निर्णय घेता येतो, पण त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी आपण घेतलेल्या निर्णयाच्या दृष्टीने अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडथळ्यांचे निवारण करणे हेदेखील प्रशासनाचे कर्तव्य आहे. अनेक भागांतील वाहतूक व्यवस्था ही रस्त्यावरील सिग्नलवर अवलंबून असते. सिग्नल बंद पडल्यास अथवा सिग्नल यंत्रणेमध्ये बिघाड झाल्यास वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडतो व त्यातून वाहतूक कोंडीचा उद्रेक होतो. दुचाकी वाहनांचे होत असलेले अपघात पाहता चालक व चालकांसोबत असलेल्या प्रवाशांच्या जीवितरक्षणासाठी हेल्मेट सक्तीच्या निर्णयाचे समर्थन पोलिसांकडून



करण्यात येत आहे. दुचाकी वाहनांचे अपघात हे वर्दळीच्या ठिकाणीच अधिक होतात. वर्दळीच्या ठिकाणी म्हणजे रस्त्यावर वाहनांच्या संख्येने नागरिकांची होत असलेली ये-जा अपघाताला निमंत्रण देत असते, खतपाणी घालत असते. रस्त्यालगत असलेल्या पदपथावर फेरीवाल्यांचे अतिक्रमण असल्याने पादचाऱ्यांना पदपथावर ये-जा करणे अवघड झाले आहे. फेरीविक्रेते व त्यांचे ग्राहक याचीच वर्दळ पदपथावर असते. पदपथ हे फेरीविक्रेत्यांचे व्यवसायाचे केंद्र बनले आहे. त्या-त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पदपथ अतिक्रमणमुक्त करण्यात अपयश आले आहे. मुळातच पालिका, नगरपालिका प्रशासनातील अतिक्रमण विभागातील त्या-त्या संबंधितांचे फेरीवाल्यांकडून नियमित स्वरूपात खिसे भरले जात असल्याने पदपथावरील फेरीवाल्यांना प्रशासकीय घटकांकडूनच आश्रय मिळत गेला. न्यायालयाने पदपथ फेरीवाल्यांच्या अतिक्रमणातून मुक्त करण्यासाठी आदेश देऊनही या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. कारण न्यायालयीन निर्णयाची अंमलबजावणी करण्यापेक्षा फेरीवाल्यांकडून नियमित मिळणारा आर्थिक मलिदा हा प्रशासकीय यंत्रणेला महत्त्वाचा वाटत आहे. फेरीवाल्यांनी पदपथ बळकावल्यामुळे रहिवाशांना ये-जा करण्यासाठी रस्त्यावरच यावे लागते. रस्त्यावर आधीच वाहनांची वाढलेली संख्या तसेच रस्त्यावरूनच सुरू असलेली लोकांची येजा यामुळे वाहने हाकणे दुचाकीस्वारांना अवघड होऊन बसते. रस्त्यावरील लोकांचा चुकविताना व अन्य वाहनांपासून आपले वाहन गर्दीतून बाहेर काढणे एक प्रकारचे अग्निदिव्यच होऊन बसले आहे. त्यामुळे तोल जाणे, अन्य वाहनांना ठोकर देणे, रस्त्यावरील नागरिकांना ठोकर देणे या घटनांना नकळत खतपाणी मिळत जाते आणि रस्ते मात्र अपघातांमुळे बदनाम होतात. त्या-त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी पदपथ फेरीवालामुक्त केल्यास रस्त्यावरील अपघातांना बऱ्याच प्रमाणात आळा बसेल. रस्त्यावरील खड्डे हे वाहतूक कोंडीचे व रस्त्यावरील अपघातांचे प्रमुख कारण आहे. पावसामध्ये रस्त्यावर खड्डे पडत असले तरी ते बुजविण्यात उदासीनता दाखविली जाते. विविध केबल्स टाकण्यासाठीदेखील रस्त्यांचे खोदकाम होते. जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या टाकण्यासाठी खोदकाम करण्यात येते. हे खोदकाम, रस्त्यावर पडलेले खड्डेदेखील अपघातांना निमंत्रण देतच असतात. अनेकदा खड्डे बुजवण्यासाठी पेव्हर ब्लॉक जरी वापरले जात असले तरी खड्ड्यात ते पेव्हर ब्लॉक दबले जात असल्याने रस्ते समपातळीऐवजी वरखाली झालेले दिसून येतात. अपघात झाल्यावर जीविताच्या रक्षणासाठी हेल्मेट दुचाकीचालकांसाठी व मागे बसलेल्या सहप्रवाशांसाठी आवश्यक बाब असली तरी अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. हेल्मेट सक्ती करण्यापूर्वी बाजारात त्या संख्येने हेल्मेट विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याचा आढावाही पोलीस यंत्रणेने घेणे आवश्यक आहे. एकीकडे रस्त्यावर असलेली वाहतूक, पोलिसांचा अभाव, सिग्नल यंत्रणेतील बिघाड याही समस्येचे निवारण करण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. पदपथ फेरीवालेमुक्त, खड्डेमुक्त रस्ते, सदोष सिग्नल यंत्रणा, वाहतूक पोलिसांची उपलब्धता याची अंमलबजावणी झाली तरी किमान ८५ ते ९० टक्के अपघातांना आळा बसण्यास मदत होईल. आधी बाजारात हेल्मेट उपलब्ध करून द्या, मग सक्ती करा, असा सूर आताच वाहनचालकांकडून आळविला जात आहे.

## फ्लाईंग बर्डस् ॲकॅडमीत पालक मार्गदर्शन शिबिर



माजलगाव । प्रतिनिधी फ्लाईंग बर्डस अकॅडमी माजलगाव शाळा येथे दि ३० नोव्हेंबर शनिवार रोजी पालक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे आयोजन फ्लाईंग बड्र्स कार्यक्रमास प्रमुख अतिथी सेलू येथील अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य आबासाहेब सावंत यांनी पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या सारिका बजाज या होत्या यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष पांडुरंगजी चांडक यांनी केले कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ॲड.विष्णू सावंत तसेच हभप हनुमान आहेर पंढरपूरकर यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी सोपानराव पवार,ऐश्वर्या चांडक सौ.माया चांडक संचालक प्रभाकर शेटे,अण्णासाहेब तौर,वसंत पाटील भगवान लाटे जगदीशजी चांडक,राहुल चांडक उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विशेष ॲक्टिव्हिटी साठी मुलांना प्रोत्साहनपर स्टार स्टुडन्ट अवार्ड देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी पालकांच्या भूमिकेचे महत्त्व आणि मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये त्यांची जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. तसेच, मुलांच्या शिक्षण, मानसिक आरोग्य आणि तांत्रिक युगातील आव्हाने यावर उपाय सुचवले.शिबिरात पालकांसाठी विशेष सत्र आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये तज्ञांनी शंका समाधान केले. विविध विषयांवर सखोल चर्चा झाली आपल्या पाल्याशी संवाद साधण्याचे कौशल्य मुलांना अभ्यासात गोडी कशी लावावी. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि मर्यादा इत्यादी विषयावर मार्गदर्शनपर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुळे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन काकडे मॅडम यांनी केले. हा उपक्रम पालक व विद्यार्थ्यांमधील नाते अधिक मजबूत करण्यासाठी एक सकारात्मक पाऊल ठरला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यकामास पालकांनी उपस्थित राहून पालक मार्गदर्शन शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद दिला.

# कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने महिला आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकणासाठी आयोजित

## आवळा प्रक्रिया प्रशिक्षणाला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद :-

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : ङ्गआवळाङ्ग हे फळ जीवनसत्व मकफयुक्त असून आवळ्याला बहुगुणी म्हणून देखील संबोधल्या जात. परंतु आवळा हे फळ त्याच्या तुरट चवीमुळे जशास तसा खाणे ब-याचदा शक्य होत नाही. त्यावर उपाय म्हणून आवळा प्रक्रिया करून त्यापासून कँडी, मुरावळा, लोणचे, पावडर, चटणी आणि सुपारी यासारखी प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करून आवश्यक तेवढ्या प्रमाणात खाणे सहज शक्य होते. तसेच बनवलेले पदार्थ विकणे हा उद्योग देखील उभारून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतील, या दृष्टिकोनातून कृषी विज्ञान केंद्र पोखरणी नांदेड-१ च्या वतीने तीन दिवसीय ङ्गआवळा प्रक्रियाङ्ग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील प्रशिक्षणासाठी ग्रामीण, शहरी महिला व युवतींचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभला .सदरील प्रशिक्षणाची सुरुवात कृषी अनुसंधान परिषद गीताने करण्यात आली असून प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाला कृ.वी.के. च्या कोषाध्यक्ष सौ. शोभाताई जाधव आणि सचिव सौ.शर्मिष्ठाताई



जाधव यांची विशेष उपस्थिती लाभली असून उपस्थित महिलांना मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सक्षम होण्याकरिता शेतीसोबत जोड व्यवसाय करण्याचे आवाहन देखील त्यावेळी त्यांनी केले. तसेच कृ.वी के.चे संचालक -डॉ. एस. डी.मोरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. डी.ए.देशमुख, प्रा.एम.जी.कल्याणकर( पिक संरक्षण तज्ञ), डॉ.एम.एन.अंबोरे( पशुवैद्यक तज्ञ) , प्रा. एस.एच.जायभाये ( कृषी विद्या तज्ञ) यांनी देखील उपस्थित महिला व युवतीला मार्गदर्शन आणि सदरील प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणाचे आयोजन प्रा. सौ. ए. एस. पवळे पाटील ( गृहविज्ञान तज्ञ) यांनी केले असून अनुभवी उद्योजिका म्हणून ओळखल्या जाणा-या सौ.एस.ए. कावळे यांनी महिलांना प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले.त्यामध्ये एकूण सहा प्रक्रियायुक्त पदार्थांचे प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. तसेच प्रा.पवळे पाटील यांनी खाद्यपदार्थांचे पॅकेजिंग, लेबलिंग, लायसनिंग आणि मार्केटिंगचे सादरीकरणातून मार्गदर्शन देखील उपस्थित महिलांना त्यावेळी करण्यात आले. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी प्रमाणपत्र वाटप आणि प्रशिक्षणार्थीचा अभिप्राय घेऊन राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

# पोलिसांनी पकडलेल्या बैलांची अखेर सुटका

**बीड (प्रतिनिधी)**

**बीड । प्रतिनिधी परळी येथुन १३ ऑक्टोबर रोजी बैल घेऊन जाणारा टेम्पो पोलिसांनी पकडून कारवाई करण्यात आली होती ती आज दिनांक ३० नोव्हेंबर रोजी घेऊन जाणाऱ्या बैलांची सुटका झाली आंबेजोगाई जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांच्या आदेशामुळे हैद्राबाद येथे कत्तलिसाठी जात असलेल्या १७ नंदिना मिळाले अभयदान १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी परळी येथील गोरक्षक दल यांनी पोलिस प्रशासन च्या सहकार्य**



**ने हैद्राबाद येथे कत्तलिसाठी गोवंश घेवून जाणाऱ्या टेम्पो वरती कायेदशिर कार्यवाही करीत गुन्हा नोंद केला व १७ नंदिना श्री रतन जी कोठारी यांच्या रामरक्षा गोशाळा भोपला, परळी येथे पुढील संगोपण साठी वर्ग केले .गुन्ह्यात कसाया तर्फे परळी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब न्यायालय येथे अर्ज दाखल केला असता त्यात त्याचा अर्ज अटी व शर्ती सह मंजूर करीत जप्त नंदी हे कासायाच्या ताब्यात देण्याबाबत आदेश केला या आदेशाला आव्हान देत आंबाजोगाई येथे जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब यांच्याकडे अर्ज केला असता न्यायालयाने स्थगिती दिली व १७ नंदिना अभयदान दिले सदर प्रकरणात गोशाळा तर्फे ॲड अशोक मुंडे यांनी बाजु मांडली तर यांना सहकार्य, मार्गदर्शन अशोक जैन साहेब ,ॲड राजू गुप्ता मुंबई, सचिन दादा, ॲड शिवानीजी , ॲड हाके पाटील,ॲड सावित्री दहिफळे, यांनी केले तसेच राजु भाई शहा, वर्धमान संस्कार धाम मिलिंद भाऊ एकबोटे, शिवशंकर जी स्वामी यांनी देखील विशेष साह्य केले.**

## महिलेचा विहिरीत पाय घसरून पडल्याने मृत्यू

म्हसोबावाडी । प्रतिनिधी आष्टी तालुक्यातील चोभा निमगाव येथील वैशाली उर्फ राणी अमोल सरोदे(वय २५ वर्ष) ही नवविवाहित महिला सकाळी शौचास आपल्या घराच्या जवळील शेतामध्ये गेली असता विहिरीच्या जवळून पुढे जात असताना विहिरीमध्ये पाय घसरून पडल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. याबाबत सविस्तर माहिती अशी की , शनिवार दि.३०/११/२०२४ रोजी वैशाली सकाळी झोपेतून उठल्यानंतर घरातील मंडळी झोपेत असतानाच शौचास घराच्या जवळील शेतामधील विहिरीजवळून जात होती यावेळी विहिरीला संरक्षण कठडे नसल्याने विहिरीत पाय घसरून पडल्याने तीचा जागीच मृत्यू झाला. वैशाली ही बराच वेळ घरी न दिसल्याने घरातील मंडळींनी तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असता , बराच वेळ ती मिळून आली नाही. नंतर आजूबाजूला माहिती मिळाल्यानंतर सर्वांनी तिला शोधण्याचा प्रयत्न केला असता घराच्या जवळील शेतामध्ये विहिरीत सकाळी ११.३० वा. च्या दरम्यान तिचा मृतदेह सापडला. याबाबत कडा पोलीस चौकी येथे याबाबतची माहिती देण्यात आली . यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शवविच्छेदन करण्यासाठी पाठवण्यात आला. रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते कारण तिचे आई-वडील हे कारखान्यावरती ऊस तोडणीसाठी गेले असल्याने त्यांना येण्यास उशीर झाला ते आल्यानंतर सकाळी सर्वांच्या संमतीने शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर रविवारी दुपारी १.३० वा. वैशालीवर चोभा निमगाव येथील मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावासह परिसरातील लोकांनी गर्दी केली होती. परिसरात हळहळ व्यक्त केली जात होती. याबाबत अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे करत आहेत

## निवडणुका पारदर्शीतेत पार पाडण्यात माध्यमांचे सहकार्य : जिल्हाधिकारी

# जिल्हाधिका-यांनी माध्यमांचे मानले आभार

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : निवडणूक प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर माध्यमांनी सहकार्य केले, त्यामुळे निवडणुकीचे कार्य अधिक पारदर्शितेत पार पाडणे शक्य झाल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीनंतर पत्रकारांसोबत शासकीय विश्रामगृहात रविवारी अनौपचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत बोलत होते. व्यासपीठावर यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, विभागीय अधीस्वीकृती समितीचे अध्यक्ष



तथा जेष्ठ पत्रकार विजय जोशी, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोवर्धन बियाणी,ज्येष्ठ पत्रकार शंतनू डोईफोडे,म. अब्दूल सत्तार आरेफ,केशव घोणसे पाटील, प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स व समाज माध्यमांच्या प्रतिनिधीची उपस्थिती होती. यावेळी माध्यमांशी अनौपचारिक गप्पा करताना त्यांनी गेल्या वर्षभरापासून यंत्रणा निवडणुकीच्या संदर्भातील कामांमध्ये व्यस्त असल्याचे स्पष्ट केले.मात्र यावेळी नांदेडच्या प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाने निवडणूक कार्यामध्ये उत्तम प्रसिद्धी दिली. त्यामुळे शासनाने सामान्य जनता यामध्ये निवडणुकीची पारदर्शकता आणखी उठून दिसली. विशेषतः नांदेडमध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणूक एकत्रित असताना निवडणुकी संदर्भातील प्रत्येक गोष्ट आम्ही माध्यमाला सांगितली. कोणतीही गोष्ट बाजूला ठेवली नाही. लपवून ठेवली नाही. त्यामुळे पारदर्शतेने जनतेपुढे आमचेही कार्य आले. त्यासाठी माध्यमांचे आम्ही आभारी आहोत ,असे कौतुक त्यांनी यावेळी केले. तसेच माध्यमांनी सकारात्मकतेने यासर्व बाबीचे वृत्तांकन केल्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले. दिलेले वृत्त वेळेत प्रसिद्धीस दिले. काही खुलासे लगेच प्रसिद्ध केले. मतदार लोकप्रतिनिधी यांच्यासाठी निवडणूक काळामध्ये वेगवेगळ्या सूचना वेळोवेळी द्याव्या लागतात. अशावेळी प्रशासन माध्यमांवर अवलंबून असते. जनजागृती पासून तर वेगवेगळ्या सूचनांना वेळेत प्रसिद्धी दिल्याबद्दल जिल्हाधिका-यांनी माध्यमांचे आभार मानले. यावेळीनिवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी पत्रकारांसोबत या स्नेह निमंत्रण कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल माहिती दिली. पत्रकार विजय जोशी, शंतनु डोईफोडे, म. अब्दूल सत्तार आरेफ, डॉ. दिलीप शिंदे, श्रीनिवास भोसले, राम तरटे, किशोर वागदरीकर यांनी आपल्या संबोधनात प्रशासनाचे आभार मानले. तसेच गतिशील पद्धतीने माहिती दिल्याबद्दल जिल्हा माहिती कार्यालयाच्या यंत्रणेची व मीडिया पक्षाचे स्वागत केले.

## बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अनाधिकृत राजकीय बॅनरबाजी विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांची निदर्शने ; शहर विद्रुपीकरण कायद्यांतर्गत कारवाईची मागणी ; आंदोलनानंतर नगरपरिषद प्रशासनाला आली जाग तासाभरात बॅनर काढण्यास सुरुवात :- डॉ.गणेश ढवळे

बीड :- ( दि.०२ ) बीड शहरातील मुख्य चौक असणा-या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील वर्दळीच्या ठिकाणी विविध पक्षांच्या नेत्यांच्या निवडी व शुभेच्छा देण्यासाठी लावण्यात आलेली होर्डिंग्ज छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे पर्यायाने शहराचे विद्रुपीकरण करत असुन वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारे होर्डिंग्ज तातडीने काढुन घेण्यात यावेत तसेच न काढणारा विरोधात महाराष्ट्र मालमत्तेच्या निरूपणास प्रतिबंधक कायदा १९९५ मधील तरतुदीनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई करण्यात यावी.तसेच कारवाईस जाणिवपूर्वक टाळाटाळ करणा-या नगरपरिषद प्रशासनातील अधिका-यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२ सोमवार रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने करण्यात आली. निवेदन नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुंबई नगरपरिषद प्रशासन संचनालयाला देण्यात आले. मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी संबंधित प्रकरणात अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांना नोटीस पाठवल्याचे सांगत नगरपरिषद कर्मचा-यांनी बॅनर काढण्यास सुरुवात केली आहे. परंतु कायमस्वरूपी ठोस कारवाई व्हावी त्यासाठी फौजदारी गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता आहे.यावेळी शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, मुस्ताक शेख,रामधन जमाले , अशोक येडे, राहुल नागरगोजे , बाळासाहेब शिंदे आदी सहभागी होते.

उच्च न्यायालयाचा राजकीय नेते आणि पक्षाकडुन वारंवार अवमान ; उच्च न्यायालयात लेखी देऊनही अटींचे पालन




नाहीच

----शहर व गावाचे विद्रुपीकरण थांबविण्यासाठी उच्च न्यायालयात अनेक संघटनांनी जनहित याचिका दाखल केल्या होत्या. जानेवारी २०१७ मध्ये जनहित याचिकेवर न्यायालयाने सर्व राजकीय पक्ष प्रमुखांना त्यांच्या पक्षातर्फे बेकायदा बॅनरबाजी करण्यात येणार नाही अशी हमी देण्याचे निर्देश देत राज्यातील सर्व नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद यांना त्याचे पालन करत वेळोवेळी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र त्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत नसल्याने बेकायदा होर्डिंग्ज, बॅनर, पोस्टर इत्यादी पाहायला मिळतात. सामाजिक कार्यकर्ते तसेच सामाजिक संघटनांच्या निवेदन आणि आंदोलनानंतर सुद्धा नगरपरिषद प्रशासन आणि पोलीस प्रशासन मुग गिळून गप्पच आहे.-

नगरपरिषदेकडुन राजकीय दबावापोटी आणि आर्थिक लाभापोटी कारवाईस टाळाटाळ :- डॉ.गणेश ढवळे

---- बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज व पोस्टर लावणा-यांवर महाराष्ट्र मालमत्तेच्या निरुपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ अंतर्गत कारवाई कारवाई केली जाते. अनाधिकृत बॅनर लावणा-यांवर दंडात्मक कारवाईसह फौजदारी कारवाईची तरतूद आहे.

नगरपालिकेच्या इस्टेट विभागामार्फत होर्डिंग्ज उभारणीचा परवाना दिला जातो. परवाना देण्याआधी संबंधितांकडून ज्या त्या पोलिस ठाण्याचा, अग्नि शामक दल विभागाचा आणि शहर वाहतूक नियंत्रण शाखेकडुन ना हरकत दाखला सादर करावा लागतो.या तिन्ही खात्यांकडुन एनओसी दाखला असेल तरच इस्टेट विभागाकडून होर्डिंग्ज उभारणीला परवानगी दिली जाते. मात्र बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज बाबत नगरपरिषद प्रशासनाची कोणतीही परवानगी घेतली जात नाही.राजकीय दबावापोटी फौजदारी कारवाई करण्यात येत नाही आणि नगरपालिका प्रशासनाचा महसूल बुडत असुनही आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी नगरपरिषद प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांना आवाहन निदान छत्रपती शिवाजी महाराज चौक तरी बनरमुक्त राहु द्या :- डॉ.गणेश ढवळे

--- राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांना सामाजिक कार्यकर्ते यांचे विनम्र आवाहन आहे की निदान संपूर्ण महाराष्ट्रात रेखीव आणि आकर्षक असणारा बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती राजकीय बॅनरबाजी करून चौकाचे विद्रुपीकरण करू नये. तसेच शहरातुन जाणारे दोन राष्ट्रीय महामार्गामुळे वर्दळीच्या ठिकाणी असणा-या चौकात बॅनर लावल्याने वाहतुकीस अडथळा आणि अपघाताला निमंत्रण ठरत असुन निदान तेवढा चौक तरी बनरमुक्त राहु द्या असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ३ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# पंजाबराव डख यांचा पावसाचा अंदाज : फेंगलमुळे महाराष्ट्रातील या जिल्ह्यात पाऊस कोसळणार

## फेंगल हे चक्रीवादळ सध्या भारताच्या दक्षिण किनारपट्टीजवळ घोंगावतं आहे.

**प्रतिनिधी**

भारताच्या दक्षिण किनारपट्टीजवळ ङ्गफेंगलफ चक्रीवादळ घोंगावतं आहे. या वादळाचा महाराष्ट्रातही फटका बसणार आहे. हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी याबाबतचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्यात ढगाळ वातावरण निर्माण झाल आहे. थंडी कमी झाली आहे. ६ डिसेंबरेपर्यंत राज्यातील विविध भागात अवकाळी पावसाचा अंदाज आहे, असं पंजाबराव डख म्हणालेत. ऐन थंडीत पाऊस पडणार असल्याने पंजाबराव डख यांनी शेतक-यांना महत्वाचा सल्ला दिला आहे. कांदा, मका उत्पादक शेतक-यांनी काढणी केलेल्या शेतमालाला चांगले झाकून ठेवा, असं डख म्हणालेत. फेंगल चक्रीवादळामुळे राज्यात अनेक ठिकाणी पाऊस पडू शकतो, असा अंदाज पंजाबराव डख





यांनी व्यक्त केला आहे. मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड, परभणी, वाशिम, बीड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात पाऊस होणार आहे. तर विदर्भातील यवतमाळ, नागपूर, बुलढाणा, जालन्यात पावसाची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर तर उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, निफाड, मालेगाव, जळगाव या भागात अवकाळी पाऊस पडण्याचा अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे. ८ डिसेंबरपासून राज्यातील हवामान स्वच्छ होऊन पुन्हा थंडीला सुरूवात होईल, असंही त्यांनी सांगितलं आहे. ङ्गफेंगलफ हे चक्रीवादळ सध्या दक्षिण किनारपट्टीवर आहे. त्यामुळे वातावरणावर परिणाम झाला आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये पाऊस झाला आहे. या अवकाळी पावसामुळे अनेक भागात नुकसान झालं आहे. तर या ङ्गफेंगलफ चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रातही पाहायला मिळणार असल्याचा अंदाज आहे. हवमान खात्याने याबाबतचा अलर्ट दिला आहे. शिवाय पंजाबराव डख यांनीही पावसाबाबतचा अंदाज वर्तवला आहे.

### पाऊस कोसळणार ?

राज्यात उद्या म्हणजेच ३ डिसेंबर रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, धाराशीव परिसरात मध्यम ते हलक्या स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. फेंगल हे चक्रीवादळ येत्या २४ तासात आणखी तीव्र होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे शेतक-यांनी आपल्या पीकांची काळजी घ्यावी, असं आवाहन पंजाबराव डख यांनी केलं आहे.

# आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा उपसरपंच शरदराव गोपाळ मनुर.



माजलगाव / प्रतिनीधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा अशी मागणी माजलगाव मतदारसंघातील जनतेतून होत असून. नुकतीच माजलगाव विधानसभा निवडणुक झाली असुन माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे. मागील पस्तीस वर्षांमध्ये आमदार प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे मतदारसंघात केली आहेत. तर जलसिंचनाचे अनेक प्रश्न मार्गी लावल्याने मतदारसंघातील बहुतांशी शेतकरी आज घडीला समृध्द झाल्याचे चित्र पाहायला मिळते. त्याचबरोबर माजलगावसह या ठिकाणी एम.आय.डी.सी.ची स्थापना झाली असून येथे असणा-या उद्योगामुळे याठिकाणी सुशिक्षीत बेरोजगार युवकांना रोजगाराची

संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांच्या पोटापाण्याचा प्रश्न मिटला आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी मतदारसंघामध्ये अनेक केलेल्या जनहिताच्या व विकास कामाच्या जोरावरच मतदारसंघातील जनतेने आ. सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघात निवडुण देऊन जनतेच्या मनातील विकसनशील आमदार प्रकाश सोळुंके यांना मंत्रिमंडळात समावेश करावा. असे मत मनुरचे उपसरपंच शरदराव गोपाळ यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

# डॉ. मारोतराव बच्चेवार यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नायगाव : नायगाव तालुक्यातील बरबडा येथील ज्येष्ठ नागरिक डॉ. मारोतराव मानेजी बचेवार याचे रविवार दि. १ डिसेंबर रोजी वयाच्या ९६ व्या वर्षी पहाटे ३.४५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली, नातू असा परिवार आहे. रविवारी सायंकाळी ४ :३० वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कृषी अधिकारी बालाजी बचेवार व किसान विद्यालय उमरा येथील शिक्षक माधव बचेवार यांचे ते वडिल होत.

# अंतकरणातील शुद्ध भावाने भगवंताला अंकित करता येते-ह.भ.प कदम महाराज

बीड । प्रतिनिधी श्रीक्षेत्र कपिलधार येथे मासिक शिवरात्री व एकदिवशीय नाम यज्ञ सोहळ्याच्या निमित्ताने कदम महाराज यांची कीर्तन सेवा संपन्न झाली महाराजांनी कीर्तनासाठी संजीवन समाधीस्थ संत शिरोमणी मन्मथ स्वामी यांचा शुद्ध भाव ज्याचा देव अंकित तयाचा या अभंगावर सुंदर असे चिंतन मांडले महाराजांनी आपल्या चिंतनामध्ये सांगितले की भगवंत हा भक्तीचा भुकेला आहे जो भगवंताची भक्ती करतो देवाला अनन्यशिरन जातो देव त्याचा अंकित होतो नव्हे नव्हे त्याची सर्व जबाबदारी भगवान भोले शिव स्वतः घेतात असेही महाराजांनी सांगितले . कदम महाराजांनी मन्मथ स्वामीच्या लिखाणावर व त्यांच्या संपूर्ण चारितत्रावर प्रकाश टाकला. शुद्ध भाव ज्याचा देवअंकित तयाचा या अभंगावर खुप सखोल चिंतन मांडले भक्तीत वचन दिले तर न मोडणारे विश्वासाने सर्व निस्वार्थ करणारे हे संत आहेत . संतआपला संसार भक्तीसाठी संपवून टाकतात. आपन दाखवणारी भक्ती करुन संसार मोठा करतो म्हणून आपला शुद्ध भाव होत नाही, भोळा महादेव अंकिता होत नाही असे मन्मथ स्वामी च्या अंभगातुन संजीवन समाधी श्रीक्षेत्र कपीलधार येथे कदम महाराज सांगवीकर यांनी सांगितले या कार्यक्रमात शिव.भ.प विश्वनाथ स्वामी मुख्य पुजारी, डॉ. त्रिंबक स्वामी कपीलधार, शंकर स्वामी जायफळकर, शि.भ.प हनुमंत कोरे, शिव.भ.प.रमेश हीरे वाळके आबा तेरखेडा, गायक श्रीराम अंबेकर चाटा, मन्मथ लामतुरे, सिध्देलिग तळेकर, रामराव कोळगीरे, राडी सिध्देश्वर, वांगसकर मसला, गायक मंडळी भजनी मंडळ सांगवी न१सांगवी न२ भ.मं चाटा भ.मं मसला भ मं कानडी भ.मं तेरखेडा भ.मं अंबेजोगाई भ.मं रामवडगाव भ.मं धनेगाव भ.मं. शेकापुर भ.मं राडी भ.मं कोड भ.मं जायफळ होते हाजोराच्या संख्येने भाविक भक्त हजर होते. या एकदिवशीय सप्ताहाचे आयोजक शिवरात्री नियोजन कमेटी व पंचकमेटी मन्मथ स्वामी देवस्थान कपिलधार तसेच दर महिना मानसिक शिवरात्र कार्यक्रम राहील तरी सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा.



# शाळा ही गावाची आई असते यात येणाऱ्या सर्वांनाच ती बालकासमान लळा लावते-ज्ञानेश्वरी आघाव

**माजलगाव प्रतिनिधी**

बीड-प्रतिनिधी मुक्तांगण या उपक्रमांतर्गत माजी यशस्वी विद्यार्थिनीं कुमारी.ज्ञानेश्वरी उद्धव आघाव या विद्यार्थिनीचा बी.ए.एम.एस. नांदेड ला नंबर लागला म्हणून तिचा सत्कार सोहळा आणि मुलाखत या दोन्हींचा समन्वय शाळेतील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट रित्या घेतला. दि.३० रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा गावंदरा येथे यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा सत्कार दरवर्षीप्रमाणे या वर्षीही घेण्यात आला. ज्ञानेश्वरीचा सत्कार श्रीम. जयश्री गुट्टे यांनी केला. यावेळी ज्ञानेश्वरीस विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले. ज्ञानेश्वरीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अतिशय प्रेरक मार्गदर्शन ठरणार आहे. यावेळी बोलताना ज्ञानेश्वरी हीने तिच्या बालपणातील आदर्श, प्रेरक शिक्षक म्हणून आदरणीय माजी शिक्षक श्री. किशोर भागवत सर यांचे अनेक गुणवर्णन ज्ञानेश्वरी हीने केले. तिला बालपणापासून कविता लिहिण्याची आवड सुध्दा किशोर भागवत सर यांच्यामुळेच निर्माण झाली. एक उत्कृष्ट शिक्षक हा कायम विद्यार्थ्यांच्या मनात घर करतो. याची पावती ज्ञानेश्वरीच्या बोलण्यावरून मिळाली. ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचा



पाया बालपणीच भागवत सर यांनी अभ्यासाची आणि इंग्रजीची गोडी निर्माण करून केलेली आहे. ती म्हणाली की, भागवत सर नेहमी नवनवीन उपक्रम राबवत असायचे त्यामुळे आम्हाला इंग्रजी शब्द पाठांतर करण्याची आवड निर्माण झाली. तिला जेव्हा विचारले की बालपणी सर्वात जास्त तुला भीती कधी वाटायची? तेव्हा ती म्हणली की , तिडके सर यांच्या रागवण्याची जास्त भीती वाटायची.तिडके सर खूप कडक होते. बालपणी तू किती तास अभ्यास करायचीस ? असे एका विद्यार्थिनीने प्रश्न विचारला असता ज्ञानेश्वरी म्हणाली मी तीन तास अभ्यास करायचे. ज्ञानेश्वरी दीदी तुला बालपणी कशा कशाची आवड होती? ज्ञानेश्वरी म्हणली ,मला वाचनाची , नीटनेटके पणाची , आणि आईला शेतातील कामात मदत करायची. मनुष्याने अभ्यास करत करत छंद जोपासायला हवेत त्यामुळे मनुष्याच्या व्यक्तीच्या आयुष्यात जिवंतपणा , चैतन्य येते. छंद हा आपला दैनदीन अभ्यास ,गृहपाठ पूर्ण करूनच जोपासायला हवेत असा ही संदेश ज्ञानेश्वरी ने दिला. तिने सांगितले की मला जस जसे मार्क चांगले पडू लागले तस तसे माझे कौतुक करण्यात आले आणि मला त्यामुळे देखील जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळाले. अनेक कौतुक सोहळे हे आयुष्याला अशी कलाटणी देतात. तसेच तिला सामान्य ज्ञान अवांतर वाचनाची जबरदस्त आवड होती. आजचा शाळेतील कार्यक्रम हा अनेक विद्यार्थ्यांच्या बालमनावर कायमस्वरूपी उमटलाच असणार अनेकांना प्रेरणा मिळणारा हा कार्यक्रम अनेक भावी डॉक्टर घडावेत यासाठीच घेतला गेला.चांगला अभ्यास केला, चांगले गुण पडले की डॉक्टर बनत. आणि आपण डॉक्टर बनलो की आपल्याला शाळेत सत्कार करण्यासाठी बोलावण्यात येते. आपल्या गावात आपले कौतुक होते. बाल मन किती बारकाईने प्रत्येक गोष्ट टिपत आणि त्याप्रमाणे कृती करण्याचा निर्धार देखील करत. गरज आहे फक्त योग्य मार्गदर्शनाची आणि प्रेरणेची. प्रेरणेचा सकारात्मक धक्का देणे प्रत्येकाला जमेल असे नाही. बाल मनावर जे राज्य करतात त्यांना ते अचूकपणे जमत. असच बालमनावर राज्य करणारे व्यक्तिमत्तव श्री. किशोर भागवत सर हे खरोखर संवेदनशील आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत. ज्यांच्या हातून अनेक डॉक्टर , इंजिनिअर , क्लास वन ऑफिसर घडले. तेही गावंदरा गावात. काम बोलकं असत याच ज्वलंत उदाहरण श्री. किशोर भागवत सर यांना आणि यांच्या कार्याला कोटी कोटी सलाम. गावाची लेक गावचा अभिमान ज्ञानेश्वरी ही गावाचा अभिमान आहे. तिच्या एम. डी. होण्याच्या भावी ध्येयासाठी हार्दिक शुभेच्छा. या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. अरुण बडे , सरपंच सौ. अयोध्या सौदरमल, श्री. बिभीषण बडे, शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्ता घोळवे, रामेश्वर मुंडे, विजयकुमार सिताप सर, बाबासाहेब चौधरी सर, विशाल कदम सर , नवनाथ बडे, श्रीम . अनुराधा मोतेवार, श्रीम. मीरा फरताडे, श्रीम. जया मुंडे या सर्वांचे सहकार्य व मिळाले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आदिती सोनार हीने केले समारोप श्रीम.जयश्री गुट्टे यांनी केल

## माजलगांवचे नाव देशपातळीवर कुस्तीच्या रुपाने पोहोचवणारा पै. सुमितकुमार भारस्कर-प्राचार्य डॉ. सानप



माजलगाव – प्रतिनिधी माजलगाव सारख्या ग्रामीण भागात जन्म घेऊन आई वडीलांची ईच्छा पूर्ण करण्यासाठी सुमित कुमार भारस्कर अहोरात्र कष्ट करून कुस्तीच्या रूपाने माजलगावचे नाव देशपातळीवर उंचावत असल्याने आनंद होत असल्याचे मत सुंदराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी व्यक्त केले आहे. सुमित कुमार भारस्कर यांनी राज्य व देशपातळीवर होणाऱ्या खेलो इंडिया या अंतर्गत गोल्ड मेडल नुकतेच पटकावले आहे, त्यामुळे त्यांचा सत्कार सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोवर्धन सानप यांनी महाविद्यालयात शिक्षण घेत असल्याने त्यांच्या सत्कार प्रसंगी बोलत असताना व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयाचे अधीक्षक सतीश एरंडे सर, एकनाथ मस्के सर, सुदर्शन स्वामी सर, दत्ता कांबळे, आवारे सर, कोरडे सर उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com